## अभियोग पक्षाचा सा.क्र. ०२ चा शपथेवर पुरावा.

मी याद्वारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करुन सांगतो की,
माझे नांव – गोविंद हरिभाऊ राठोड
वय – ६२ वर्षे, धंदा -सेवानिवृत्ती सहा.पो.उपनिरीक्षक,
रा. परभणी ता. परभणी जि. परभणी

**सहा. सरकारी अभियोक्ता श्री. आर. जी. गिरी यांच्या तर्फे सरतपास**

१. सन २०१४ ते सन २०१९ पर्यंत मी चाकूर पोलीस ठाणे चाकूर येथे कार्यरत होतो. दि.२२.०९.२०१८ रोजी गुन्हा क्र. ३०६/२०१८ कलम १८८, भादवि आणि महा. पोलीस अधिनियम कलम ३६/१३४ अंतर्गत चा तपास माझेकडे देण्यात आला. मी दोन साक्षीदार तपासले होते. दि. २४.०९.२०१८ रोजी आरोपींना कलम ४१ नुसार नोटीस देऊन सोडण्यात आले होते. तपासांती आरोपी विरुध्द पुरावा मिळाल्याने मी दोषारोपपत्र दाखल केले होते. मी आरोपींना ओळखतो.

**सरतपास पूर्ण.**

**उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. एस.व्ही. गंभीरे यांच्यामार्फत सुरु.**

२. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी पोलीस आहे. मी फिर्यादीचे पुरवणी तपास टिपण नोंदविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या जबाबामध्ये एकाही आरोपीचे नाव नमुद करण्यात आले नाही. विसर्जन मिरवणुकीचा मार्ग काय होता याबाबतचा वरिष्ठांचा कोणताही आदेश मी दोषारोपपत्रासोबत दाखल केले नाही. मी दोषारोपपत्रासोबत खडक हणुमान गणेश मंडळ यांचे अध्यक्ष, सचिव, सदस्य, मिरवणुक प्रमुख, प्रसिध्दी प्रमुख व इतर पदाधिकारी या बाबतचा कोणताही दस्त दोषारोपपत्रासोबत दाखल

केला नाही. मी घटनास्थळ पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, तपासामध्ये आरोपी विरुध्द कोणताही पुरावा नसतांना मी आरोपीविरुध्द खोटे दोषारोपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2026.06.09 12:25:57 +0530

(व्ही.एस. वाघमोडे)

दि. ०९.०६.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.